रविवार, दि. २२ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २०१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




# शेतकऱ्यांना आधार अन् अर्थव्यवस्था मजबूत करणारा अर्थसंकल्प - रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दि. ०६ मार्च २०२६ रोजी अर्थसंकल्प सादर केला, यामध्ये शेतकऱ्यांना दोन लाखांची कर्जमाफी देऊन आधार, एआय तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीला प्रगतीच्या महामार्गावर नेणारा पक्क्या रस्त्यांद्वारे ग्रामीण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आणखी मजबूत करणारा, मेट्रोसारख्या सुविधांच्या माध्यमातून शाश्वत शहरी विकासाला चालना देणारा महायुती सरकारचा यावर्षीचा अर्थसंकल्प महाराष्ट्राला लवकरच ट्रिलियन डॉलर्स ची अर्थव्यवस्था बनवेल, असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केला आहे.




यावेळी भारतीय जनता पार्टीचे नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, भाजपा जालना ग्रा. जिल्हाध्यक्ष आ.नारायणभाऊ कुचे, माजी आमदार कैलासजी गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, गटनेते महेश निकम, युवानेते नगरसेवक अक्षय गोरंटयाल, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, गोविंद ढेंबरे, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, अमोल धानुरे, माजी जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, नगरसेवक शशिकांत घुगे, अर्जुन गेही, सिद्धिविनायक मुळे, बंसीधर आटोळे, सतीश जाधव, बाबासाहेब कोलते, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

रावसाहेब पाटील दानवे यांनी राज्याच्या अर्थसंकल्पाचा विस्ताराने आढावा घेऊन त्यातील सर्व समाज घटकांसाठी करण्यात आलेल्या विविध तरतुदींची माहिती दिली. ते म्हणाले की, विकसित भारताचे स्वप्न २०४७ पर्यंत साध्य करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्धाराला महाराष्ट्राची मोलाची साथ मिळावी या दृष्टीने या वर्षीच्या अर्थसंकल्पाची आखणी करण्यात आली आहे. शेती, उद्योग, सेवा, ऊर्जा, शिक्षण, सिंचन, पायाभूत सुविधा अशा सर्व क्षेत्रांच्या विकासाचा मार्ग दाखविण्याबरोबरच या अर्थसंकल्पात सामान्य माणसाला सुशासनाची, गतिमान प्रशासनाची अनुभूती देण्यासाठीही दूरगामी परिणाम करणारे निर्णय घेण्यात आले आहेत. गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना महायुती सरकारने दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ पान २ वर



**महास्वच्छता अभियान बॅनर व्हॅन चे शुभारंभ माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आमदार नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंट्याल महापौर वंदना मगरे उपमहापौर राजेश राऊत, भास्कर दानवे अक्षय गोरंट्याल आदी (छायाचित्र अनिल व्यवहारे)**

## चंदनझिऱ्यात ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण; रमजान ईद उत्साहात

### मदरसा फैजुलउलूम येथे मोठ्या संख्येने मुस्लिम बांधवांची उपस्थिती



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील चंदनझीरा परिसरात रमजान ईद मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली.

चंदनझीरा येथील मदरसा फैजुलउलूम ईदगाह मैदानावर आज सकाळी मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने एकत्र येत सामूहिक नमाज अदा केली. हाफेज अ. अजीम यांनी ईदच्या नमाजची इमामत करत पवित्र खुतबा वाचला. तर मुफ्ती एहसान साहेब यांनी उपस्थितांना इस्लाम धर्मातील मूल्ये, शांतता आणि बंधुभावाचा संदेश दिला. रमजान महिना मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र मानला जातो. या संपूर्ण महिन्यात रोजा ठेवून संयम, त्याग आणि आत्मशुद्धीचा संदेश दिला जातो. या महिन्याच्या समाप्तीनंतर ईद उल फित्रचा सण साजरा केला जातो.

याच पार्श्वभूमीवर आज ईदगाह मैदानावर मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव एकत्र आले होते. नमाजनंतर सर्वांनी एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. एकूणच, जालना शहरात रमजान ईद सण शांततेत आणि उत्साहपूर्ण साजरा करण्यात आला.



**रमजान ईदच्या निमित्ताने माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी बालपणीचे मित्र मसूद अहमद कुरेशी यांना भेट देत ईदच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी दोघांमधील अनेक वर्षांची जुनी आणि घट्ट मैत्री पुन्हा एकदा दिसून आली. प्रसंगी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, बद्रीनाथ पठाडे, तसेच अर्जुन गेही, संजय भगत, मनोज इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.**

# संपादकीय पान

## जल ही जीवन हैं !

आजचा दिवस जागतिक जल दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज आहे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जगू शकत नाही. पाण्याची गरज नाही असे कोणतेच क्षेत्र नाही. पण आज जगभर पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. पूर्वी मुबलक स्वरूपात उपलब्ध असणाऱ्या पाण्याची आज मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे. पाण्याचे महत्व अनन्य साधारण आहे. पाणी बचत ही काळाची गरज बनली आहे. यामुळेच पाण्याच्या बचतीसाठी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने १९९२ मध्ये झालेल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २२ मार्च १९९३ रोजी पहिल्यांदा जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. ब्राझीलची राजधानी रियो डी जिनोरियो येथे पहिला जल दिन साजरा करण्यात आला. पाणी बचतीसाठी जगभरात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. २२ मार्च हाच दिवस जागतिक जल दिन म्हणून निवडण्यामागे कारणही तसेच आहे. २२ मार्च पासून वातावरण बदलास सुरवात होते. त्यामुळे तात्विक दृष्ट्या पावसाळ्याची सुरवात होण्यासाठी हा दिवस कारणीभूत ठरतो. हा तर्क वापरुन हा दिवस निवडण्यात आला आहे. पृथ्वीवर पाण्याचे पाण्याचे प्रमाण ७१ टक्के इतके असले तरी पिण्यायोग्य पाणी अल्प प्रमाणात आहे. वाढत्या लोकसंख्येची तहान भागवण्यास हे पाणी कमी पडत आहे. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज असली तरी इतर सजीव पाण्याच्या अपव्यय करित नाहीत मानव मात्र पाण्याचा मोठा अपव्यय करतो, गरजेपेक्षा जास्त पाणी वापरतो. पाणी वापराचे नवनवीन मार्ग मानव शोधीत असतो त्यामुळे पाण्याची तीव्रता जाणवते. हवामान बदलामुळे पावसाच्या पद्धतीत झपाट्याने बदल होत आहे. पूर्वी नियमित येणारा पाऊस आता बेभरवशाचा झाला आहे. पावसाचे दिवस आणि पावसाचे प्रमाणही कमी होत चालले आहे. त्यामुळे दुष्काळाचे प्रमाणही वाढले आहे. जागोजागी बोअरवेल घेऊन जमीनीखालील पाणीही मानवाने संपवले आहे त्यामुळे भविष्यात पाणी टंचाईची समस्या आणखी गंभीर होणार आहे. त्यामुळेच कदाचित पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होईल असा अहवाल काही दिवसांपूर्वी संयुक्त राष्ट्र संघाने दिला आहे. २०२५ पर्यंत जगातील एक तृतीयांश देशात पाणी पेटणार असल्याचे संकेत शास्त्रज्ञांनी दिले आहेत. आशिया खंडाबाबत सांगायचे झाले तर भारतात पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात आहे. भारतात मार्चच्या सुरवातीलाच पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागतात. दरवर्षी ४० टक्के गावांत दुष्काळ असतो. महाराष्ट्रातील मराठवाडा सारख्या विभागात तर दरवर्षी दुष्काळ असतो. लातूर सारख्या शहराला रेल्वेने पाणी पुरवठा करावा लागतो. ग्रामीण भागात तर भीषण पाणी टंचाई जाणवते. अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. एकदा आलेला टँकर आठ दिवसांनीच पुन्हा येतो. काही गावात तर एका महिन्यात एकदाच पाणी मिळते. हंडाभर पाण्यासाठी महिलांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागते. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. कृत्रिम पाणी तयार करण्यात अजूनही शास्त्रज्ञांना यश आले नाही म्हणूनच आहे त्या पाण्याची बचत करणे हेच आपल्या हातात आहे. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करूनच आपण पाणी टंचाईवर मात करू शकतो. जल है तो कल है... या उक्तीनुसार येणारा काळ सुखकर करायचा असेल तर पाण्याची बचत करावीच लागेल. आजच्या दिवशी प्रत्येकाने पाणी बचतीचा संकल्प करून पाणी बचतीसाठी प्रयत्न केला तरच जागतिक जल दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

## साताऱ्यातील राजकीय वातातवरण तापले

**सातारा -** सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीच्या पार्श्वभूमीवर साताऱ्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या पाच जिल्हा परिषद सदस्यांनी भाजप उमेदवाराला मतदान केल्यानं सत्ता भाजपनं मिळवली. भाजपच्या प्रिया शिंदे अध्यक्ष झाल्या तर राजू भोसले उपाध्यक्ष झाले. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती करत गंभीर आरोप केले आहेत. स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांच्या जिल्ह्यात पालकमंत्र्यांनी लोकशाहीचा खून केला असून, प्रशासकीय अधिकाऱ्यांना घरगड्यासारखी वागणूक दिली जात आहे,'' असा घणाघात गोरेंनी केला. पालकमंत्री कालपासून विनाकारण आकांडतांडव करत आहेत. मागेपुढे पाच गाड्यांचा ताफा घेऊन फिरणे आणि पोलिसांची हरेसमेंट करणे हे त्यांचे नित्याचे झाले आहे. चौकात पोलीस दिसला नाही तर त्याला सस्पेंड करण्याच्या धमक्या दिल्या जातात. साक्षात पोलीस अधीक्षकांशी बोलताना सुद्धा ते एखाद्या घरगड्याशी बोलल्यासारखे वागतात, हे अत्यंत निंदनीय आहे.जिल्हा परिषद अध्यक्षांची ही निवडणूक होती, त्यात पालकमंत्र्यांना आत जाण्याची काय गरज होती?'' असा सवाल गोरेंनी उपस्थित केला.

पान १ वरुन

## शेतकऱ्यांना आधार ...

करून मोठा आधार दिला आहे.

दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असणाऱ्या शेतकऱ्यांचे दोन लाखांचे कर्ज माफ करण्याबरोबरच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी, अ‍ॅग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी इत्यादी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकात्मिक इकोसिस्टीम यासारखे निर्णय शेतकऱ्याला गतिमान बाजारपेठेशी जोडण्यात मदत करणारे आहेत, असे त्यांनी नमूद केले.

रावसाहेब पाटील दानवे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरुच राहणार आहे. या योजनेसाठी सुमारे २० हजार कोटींची तरतूद महायुती सरकारने केली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून १६ हजार मे.वॅ. ऊर्जाक्षमता निर्माण करण्यात येणार आहे. यातून १०० टक्के कृषीपंपांना दिवसा वीजपुरवठा होईल.

# “जल ही जीवन,जल ही अमृत” संपूर्ण सृष्टीसाठी पाण्याचा एक-एक थेंब महत्त्वाचा

आज जगात पाणी हा महत्वाचा घटक आहे. कारण जल नहीं तो कुछ नहीं! पृथ्वीतलावर मानवजातीच्या अतीरेकामुळे आज निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे.अन्न, वस्त्र, निवारा याची मुख्य जळ-मुळ पाणी आहे. कारण पाण्याशिवाय कोणतीही गोष्ट शक्यच नाही.भारतासह अनेक देशांमध्ये दरवर्षी पाण्याचा हा!हा!कार! होतांना आपण पाहतो.भारतात मार्च महिन्यापासुनच देशातील अनेक भागांत पाण्याची समस्या निर्माण होत असते.आजही अनेक देश पाण्यासाठी कडवी झुंज देत आहे. आज आपण कुठेही गेलो तरी पाणी अती आवश्यक आहे.आकाश-पाताळ,पुर्व-पश्चिम, उत्तर- दक्षिन म्हणजेच आपण जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी मानव, पशु-पक्षी व संपूर्ण जीवजंतू हे पाण्याविना जगुच शकत नाही.पाण्याविना निसर्ग नाही व मानवही नाही.म्हणजेच आज पाणी सर्वांसाठीच अनमोल आहे.त्यामुळे पाण्याचे महत्व सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे.१९९२ ला पर्यावरण व विकास या विषयावर संयुक्त राष्ट्र संमेलन आयोजित करण्यात आले होते.यावेळेस विश्व जल दिवस या विषयावर चर्चा करण्यात आली व संयुक्त राष्ट्र संघानेने प्रत्येक वर्षी २२ मार्चला विश्व जल दिवस साजरा करण्याचे जाहीर केले.यानंत १९९३ मध्ये २२ मार्चला संपूर्ण जगात विश्व जल दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला.यावेळेस जल संरक्षण आणि रख-रखाव यावर जनजागृतीचे मोठे अभियान छेडण्यात आले.विश्व जल दिवसाला पाणी वाचविण्याचा ‘‘संकल्प‘‘ दिवस सुध्दा म्हटल्या जाते.या दिवसाला पाणी संरक्षणा विषयी जागृकता व पाण्याचे महत्व याला जास्त महत्त्व दिले जाते.आज मानवाच्या जीवनाचा महत्वाचा घटक म्हणजे पाणी आहे. कारण पाण्याविना संपूर्ण सृष्टीअधुरी आहे. आपण जगाच्या भुभागाचा विचार केला तर या पृथ्वीतलावर ७० टक्के पाणी व ३० टक्के भुभाग आहे.तरीही जगात पीण्याच्या पाण्याची समस्या अत्यंत गंभीर असल्याचे दिसून येते.कारण ७० टक्के समुद्राचे पाणी खारे असल्यामुळे पीण्यायोग्य नाही.सध्या संपूर्ण जग अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करतांना दिसते.त्यामुळे जगात अनेक नवीन नवीन समस्या उदयास येतांना दिसतात. त्यामुळे आज संपूर्ण जगात पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे बदलते हवामान व जगातील वाढती लोकसंख्या यामुळे जगातील ५० टक्के जंगलसंपदा मानवाच्या अतिरेकामुळे नस्तनाबुत झाली आहे. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता ते सरळ समुद्रात जात आहे. यामुळे आज जगात अत्यंत गंभीर समस्या निर्माण होऊन दिवसेंदिवस समुद्राची पातळी वाढत आहे. समुद्राची पातळी वाढने म्हणजेच पृथ्वीतलावरील संपूर्ण सृष्टीच्या बाबतीत धोक्याची घंटा आहे.त्यामुळे पाण्याचा विषय साधा नसुन अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय आहे.जगात वाढते कारखाने, औद्योगिकीकरण, शहरीकरण, युद्धजन्य परिस्थिती, अनेक परमाणु परिक्षण यामुळे निसर्गानचे संतुलन डगमगतांना दिसत आहे.कारखाण्यांच्या दुषीत वातावरणामुळे व तापमानामुळे अनेक हिमकडे कोसळताना आपण पहातो. यामुळे संपूर्ण जगात महाप्रलय, सुनामी आल्याचेसुध्दा आपणासर्वांना ग्यात आहे.जगातील हिमकडे साबुत रहाले तर पाण्याची समस्या आपोआप कमी होईल.परंतु मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी हिमकड्यांचा बळी घेतांना दिसत आहे. अनेकदा देवभुमित आलेला महाप्रलय हा हिमकडा कोसळल्याने आलेला महाप्रलय आहे.संपुर्ण भारतात ८० टक्के पीण्यायोग्य पाणी हिमकड्यातुन मीळत असते. परंतु मानवाच्या अतीरेकामुळे हिमकडे वेळेच्या आधी वितळायला लागले तर या पृथ्वीतलावर २० वर्षांनंतर पीण्याकरीता एक थेंब सुध्दा पाणी मिळणार नाही.त्यामुळे पाणी वाचविण्यासाठी तळागाळातुन प्रयत्न व्हायलाच पाहिजे.आज जंगलातील संपूर्ण हिंसक पशु शहरांकडे का येत आहे.याचा विचार कोणीच करीत नाही.परंतु जगातील संपूर्ण मानवजातीने हे लक्षात ठेवले पाहिजे की,जंगलातील हिंसक पशु-पक्षी शहरात येत नसुन आपण त्यांच्या घरावर म्हणजेच जंगलावर अतिक्रमण करीत आहोत. त्यामुळे जंगलातील पशु-पक्षी शहरात व गावात येतांना दिसतात.पुर्वी छोटे-छोटे तलाव असायचे. परंतु आज पुर्विचे छोटे-छोटे तलाव वस्ती व कारखाण्यामध्ये परीवर्तीत झालेले दिसुन येतात.त्यामुळे आज गावात, शहरात,वस्तीत संपूर्ण ठिकाणी पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतांना दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे मानवाने निसर्गावर केलेला अत्याचार होय. सध्याच्या काळात जगामध्ये आगजनीच्या घटना व वनवेलागने मोठ्या प्रमाणात दिसून येतात.अनेक मोठमोठी जंगले अजुनही जळत आहे.कारण मानवाने जमीनीच्या पोटातील पाणी संपूर्णतः निचोडुन (आटवुन) टाकले आहे.जगातील अनेक भागात ज्वालामुखीचा उद्रेक मोठ्या प्रमाणात होतांना आपण पहातो.भुकंप,सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण घटना पृथ्वीतलावर पाण्याची पातळी कमी होत असल्याने होत आहे. कारण जंगलसंपदा टीकुन रहाली असती तर पाण्याची समस्या मुळातच रहालीच नसती. पाणी टीकुन रहाले असते तर ज्वालामुखी, सुनामी, महाप्रलय,भुकंप,वनवे लागने इत्यादी विनाशकारी घटनांचा उद्रेक झाला नसता. अजुनही मानवजाती पाण्याचे महत्व समजल्याचे दिसून येत नाही.पुर्वी नदी,ओढे, तलाव,झिरा व विहिरीतून पाणी घ्यायचे परंतु आता नदी,तलाव व विहिरी आटुलागल्या आहेत. विहीरीची खोली ५० ते ६० फुटांपर्यंत असायची परंतु पाण्याचा दुष्काळ पहाता ५० ते ६० फुटांपर्यंतचे विहिरीचेसुध्दा पाणी आटल्याचे दिसून येते. त्यामुळे आता मानवजातीने बोरवेलचा सहारा घेऊन ५०० ते ७०० फुटांवर पाण्यासाठी जावे लागत आहे.मनुष्याला पाण्याचा अधिकार फक्त ५० ते ६० फुटांपर्यंतच होता.परंतु मानवाने पाण्यासाठी संपूर्ण सीमा ओलांडून पाताळात जाऊन तेथील पाण्यावर अतीक्रमन केल्याचे दिसून येते. म्हणजेच मानवाने सापाच्या बिळात हात टाकला आहे.ज्या पाण्यावर मानवजातीचा तिळमात्र अधिकार नाही तेही पाणी आपण आपली तहान भागवण्यासाठी वापरीत आहोत.हा मानवाचा निसर्गसृष्टीवर खुला अन्याय व अत्याचार नाही काय?आज मानवाच्या निष्काळजीपणामुळे व अतिरेकामुळे जंगले वाळुन (सुकली)गेली आहे.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसले आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.अनेक देशात गृहयुद्ध व आता महायुद्ध सुरू आहे.उदाहरण द्यायचे झाले तर रशिया -युक्रेन,अमेरिका-इजरायल-इराण-गाजा-इराण-हिज्बुला यांनी महायुद्धाचे स्वरूप घेतले आहे यामुळे युद्धाने जनुकाय रक्ताची नदी वाहत आहे की काय असे वाटत आहे.सध्याच्या परिस्थितीत या देशात आगडोंब उसळला असुन अनेक क्षेत्र जळुन खाक झाले आहे. त्याचप्रमाणे अनेक देश परमाणुपरीक्षण करतांना आपण पहातो.अशा परीस्थितीत भुमाता(पृथ्वी) पाण्याचे संग्रहन कसे काय करेल? मानव आज आगीशी खेळत आहे त्यामुळे तो पाण्याचे महत्व विसरल्याचे दिसून येते.कठीण परिस्थिती पाहता जगाने पाणी वाचवीण्याचा संकल्प करायला पाहिजे.अन्न,वस्त्र,निवारा आवश्यक आहे यात दुमत नाही.परंतु अन्न,वस्त्र, निवारा यांची उत्पत्ती ही पाण्यापासूनच होत असते.त्यामुळे भारतासह संपूर्ण जगाने विश्व जल दिवस साजरा करतांना पाण्याचे महत्व समजुन घेतले पाहिजे.जगापुढे शुद्ध पाण्याची गंभीर समस्या आहे. पाण्यासाठी अनेक देशांमध्ये हा!हा!कार! माजल्याचे दिसून येते.त्यामुळे पाणी वाचविण्यासाठी भारतासह संपूर्ण जगाने युद्ध पातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.पर्यावयण व निसर्ग सुरक्षित तर पाणी सुरक्षित. पाणी सुरक्षित तर मानव, पशुपक्षी,जीव-जंतु सुरक्षित,जिव सृष्टी सुरक्षित तर पृथ्वी सुरक्षित ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.आज अनेक देशांतील जंगल संपदा नस्तनाबुत करून कारखाने,शहरे मोठ्या प्रमाणात उभारले आहे.त्यामुळे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात जंगलातील हिंसक प्राणी (वाघ,अस्वल, सिंह, कोल्हा, बिबट्या, जहरीले साप) शहरात शिरकाव करतांना दिसतात.यामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी सुध्दा झाली आहे व होत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे जंगलातील पाण्याचा तुटवडा होय. आज पाण्यासाठी मानव व प्राणी एकमेकांचे कट्टर शत्रू बनल्याचे दिसून येते.त्यामुळे संपूर्ण जगाने पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे. असे भाकीत आहे की २०४० मध्ये भारतात प्यायला पाणी मिळणार नाही.अशी स्थिती येवू शकते याला नाकारता येत नाही.संयुक्त राष्ट्राने जगातील पाण्याच्या परीस्थितीच्या अहवालामध्ये ही भीती वर्तवली आहे.जगात पुढे पाण्याचे भीषन संकट येणार असून भारत या संकटाच्या केंद्रस्थानी रहाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.नद्या, सरोवर, तलाव यामध्ये उपलब्ध असलेले पीण्याचे पाणी झपाट्याने प्रदुषित होत आहे.त्यामुळे कारखान्याचे दुषितपाणी व सांडपाणी यांना पीण्याच्या पाण्यापासून कोसो दूर ठेवण्याची गरज आहे.दूषित पाणी पील्यामुळे जगात दरवर्षी लाखोच्या संख्येने मानवीय हाणी व पशुपक्षांची हाणी मोठ्या प्रमाणात होतांना दिसुन येते यालाही थांबविण्याची गरज आहे. एकावर्षात पडलेले पावसाचे पाणी अडवीता आले तर पाच वर्षे पुरेल इतका पाणी साठा आपल्याला उपलब्ध होवू शकतो. परंतु त्यासाठी योग्य नियोजन करणे अजुनही आपल्याला जमले नाही.आताही ८० टक्के पाणी प्रदूषित आहे. पाण्याच्या स्त्रोतांचे होणारे प्रदुषण आणि पाणी साठविण्यासाठी नसलेले नियोजन हे दोन प्रश्न आहेत.यावर दुर्लक्ष सुरूच राहील्यास येणाऱ्या काही वर्षांत पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होवू शकते असा इशारा पर्यावरण तज्ज्ञांचे दिला आहे.मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे हे लक्षात ठेवले पाहिजे की पाणी संपले तर आपण संपु,आपण संपलो तर जग संपेल! त्यामुळे विश्व जल दिनाच्या निमित्ताने प्रत्येकांनी पाणी वाचविण्याचा ‘‘संकल्प‘‘ केला पाहिजे.तेव्हाच पाणी वाचेल.त्याचप्रमाणे ‘‘पाणी वाचवा देश वाचवा‘‘ हा निर्धार संपूर्ण जगाने अंगीकारला पाहिजे.आज जगातील वाढती पाण्याची समस्या यामुळे अनेक पशुपक्षी लुप्त झाल्याचे दिसून येते. याकरीता जल विश्व दिनाच्या निमित्ताने वाढते प्रदुषण रोखण्याचा व पाणी वाचविण्याचा निर्धार सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# डोक्यावरचा हंडा काढा; पाणीपुरवठ्याचे नियोजन करा!

स्वयंपाकापासून ते सांडपाण्यापर्यंत घरात पाणी आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पिढ्यानपिढ्या महिलांनी सांभाळली आहे. आजही अनेकांना आपली आई, बहीण किंवा आजी डोक्यावर हंडा, कळशी किंवा घागर घेऊन लांबवरून पाणी आणतानाचे प्रसंग आठवते.भारतात आता हे चित्र कालबाह्य झाले तरी जगभरात अधिकही अनेक देशात नागरिक शुद्ध व नियमित पाणीपुरवठ्यापासून वंचित आहेत. त्यामुळे यंदा २२ मार्चला जागतिक जल दिवस साजरा करताना संयुक्त राष्ट्राने पाणी व्यवस्थापनात महिला सक्षमीकरणाला प्राधान्य दिले आहे.

भारताने पेयजलाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे.घराघरांत नळाद्वारे पाणी पोहोचवण्यासाठी जलजीवन मिशन प्रभावीपणे राबविण्यात आले. तरीही काही भागांत पाणीटंचाई कायम आहे आणि त्याचा सर्वाधिक भार महिलांवरच पडतो. ही समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नसून जागतिक पातळीवरही ती तितकीच गंभीर आहे. म्हणूनच यंदाचा जागतिक जल दिवस ‘‘पाणी आणि महिला सक्षमीकरण’’ या व्यापक संकल्पनेशी जोडून साजरा केला जात आहे.

**जलसंकट : असमानतेचा प्रश्न**

पृथ्वीवरील सुमारे ७१ टक्के भाग पाण्याने व्यापलेला असला, तरी त्यातील केवळ २.५ टक्के पाणी गोड आहे. त्यातीलही अत्यल्प भाग मानवाच्या वापरासाठी उपलब्ध आहे. त्यामुळे पाण्याची विपुलता ही केवळ भास आहे.

हवामान बदल, लोकसंख्यावाढ,औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्धतेत आणि वितरणात मोठी असमानता निर्माण झाली आहे. या असमानतेचा सर्वाधिक फटका स्त्रिया आणि मुलींना बसतो.

**पाणीटंचाईत महिलांचे सर्वाधिक शोषण**

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांनुसार, जगभरातील १ अब्जाहून अधिक स्त्रिया अजूनही सुरक्षित पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. सुमारे १.८ अब्ज लोकांच्या घराजवळ पाणी उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक तीन घरांपैकी दोन घरांमध्ये पाणी आणण्याची जबाबदारी महिलांवर असते.

५३ देशांतील आकडेवारीनुसार स्त्रिया आणि मुली दररोज एकत्रितपणे सुमारे २५० दशलक्ष तास पाणी आणण्यात खर्च करतात. ही वेळ शिक्षण, रोजगार किंवा वैयक्तिक विकासासाठी वापरता आली असती.

अशुद्ध पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे दररोज सुमारे १,००० बालकांचा मृत्यू होतो. याशिवाय जगातील सुमारे १४ टक्के देशांमध्ये पाणी व्यवस्थापनाच्या निर्णयप्रक्रियेत महिलांचा समान सहभाग निश्चित करणारी ठोस यंत्रणा नाही.

हे आकडे स्पष्ट करतात की जलसंकट हा केवळ नैसर्गिक प्रश्न नसून तो सामाजिक, आर्थिक आणि लिंगभेद करणारा आहे.





**महिला जलव्यवस्थापनाच्या केंद्रस्थानी हव्यात**

भारतीय संविधानामुळे स्त्री-पुरुष समानतेचा पाया मजबूत झाला आहे.आज महिला उद्योग, शिक्षण, आरोग्य अशा अनेक क्षेत्रांत नेतृत्व करत आहेत. पाणी व्यवस्थापनातही त्यांचा अनुभव अमूल्य आहे.मात्र ही स्त्री समानता आत्ता जलव्यवस्थापनातही आणणे केवळ आपल्याच देशाची नाही तर जगभराची गरज बनली आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या मते, जलव्यवस्थापनात महिलांचा सहभाग वाढल्यास सेवा अधिक शाश्वत, समावेशक आणि प्रभावी ठरतात. त्यामुळे महिलांना ‘पाणी आणणाऱ्या’ भूमिकेतून ‘पाणी नियोजन करणाऱ्या’ भूमिकेत आणणे आवश्यक आहे.

**पाणी आणि अर्थव्यवस्था : अदृश्य नाते**

पाणी हे जीवनाचेच नव्हे तर अर्थव्यवस्थेचेही मूलभूत साधन आहे. जगभरात उपलब्ध शुद्ध पाण्यापैकी सुमारे ७० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते, तर उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रालाही मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज असते.

ज्या देशांनी प्रभावी जलव्यवस्थापन केले, तेथे आर्थिक प्रगती वेगाने झाली. इस्रायलने ठिबक सिंचन, सिंगापूरने सांडपाण्याचा पुनर्वापर, नेदरलँडने पूर नियंत्रण आणि ऑस्ट्रेलियाने जलसंधारण धोरण यशस्वीपणे राबविले. ही उदाहरणे योग्य नियोजनाचे महत्त्व अधोरेखित करतात.

**जागतिक उपाययोजना : बदलाची दिशा**

पाण्याच्या समस्येवर उपाय म्हणून विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर (डिसॅलिनेशन), सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर, तसेच नदी पुनरुज्जीवन प्रकल्प यांवर भर दिला जात आहे.

महाराष्ट्रातील नागपूर येथे सांडपाण्याचा औद्योगिक वापर केला जातो, तर नवी मुंबईचे सांडपाणी व्यवस्थापन आदर्श मानले जाते. याशिवाय वृक्षारोपण आणि जलसंधारण हे पर्यावरणीय संतुलनासाठी अत्यावश्यक उपाय आहेत.

**पाणी अडवा पाणी जिरवा : प्रभावी उपाय**

पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे ही जलसंधारणाची सर्वात प्रभावी पद्धत आहे. यामुळे भूजल पातळी वाढते, विहिरी जिवंत राहतात आणि शेतीसाठी पाणी उपलब्ध होते.

शहरी भागातही रेनवॉटर हार्वेस्टिंग अनिवार्य करणे आवश्यक आहे. शासनाने नव्या बांधकामांसाठी ही अट बंधनकारक केली आहे, ही सकारात्मक बाब आहे.

**भारतातील प्रयत्न : धोरण आणि अंमलबजावणी**

भारत सरकारने पाणी व्यवस्थापनासाठी विविध योजना राबवल्या आहेत

जल जीवन मिशन प्रत्येक जल जीवन मिशन, अटल भूजल योजना,जलशक्ती अभियान,स्वच्छ भारत मिशन,महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना,मुख्यमंत्री जलसंधारण योजना,नमामि गंगे योजना अशा कितीतरी योजनांमधून केंद्र व राज्य शासन जनतेला शुद्ध पेयजल उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करत आहे.

**प्रत्येक नागरिकाची भूमिका**

शासन स्तरावर विविध योजना राबविण्यात येत असल्या तरी सामान्य नागरिकांनीही या मोहिमेत एक जबाबदार नागरिक म्हणून पुढे येणे गरजेचे आहे.पाणी वाचवण्याची सुरुवात शासनाकडून नव्हे, तर घरापासून होते. आपण काही सोपे उपाय अवलंबू शकतो.जसे की,नळ आणि पाईप गळती त्वरित दुरुस्त करणे,रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे,

सांडपाण्याचा पुनर्वापर,ठिबक सिंचनाचा वापर

पाण्याचा अपव्यय टाळणे,वृक्षारोपण करणे,घरातील पाणी व्यवस्थापनात महिलांचा निर्णयाधिकार मान्य करणे,पाणी हा केवळ नैसर्गिक संसाधन नसून तो मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि लिंगसमतेचा आधार आहे. जलसंकटाचा विचार करताना समतेचा दृष्टिकोन आवश्यक आहे. तसा विचार रुजवणे.यासोबतच घराघरात केवळ पाण्याच्या उपलब्धतेसाठी महिलांचे शोषण होणार नाही याची काळजी घेण्याचाही आजचा दिवस आहे. चला !तर महिलांच्या डोक्यावरचा हंडा काढूया आणि जल जीवन मिशन, अटल भूजल योजना,जलशक्ती अभियान,स्वच्छ भारत मिशन,महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना, विविध जलसंधारण योजनेच्या माध्यमातून पाणी टंचाई मुक्त समाज निर्मितीसाठी पुढे येऊया.. कारण पाणी वाचवणे म्हणजेच समाजाचे भविष्य सुरक्षित करणे होय.


**प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

# नारायण पवार यांची भाजप जालना महानगर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी जालना महानगरच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नारायण बुट्टा पवार यांची निवड करण्यात आली आहे. भाजपचे जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे यांनी अधिकृत नियुक्ती पत्र देऊन ही घोषणा केली.

नारायण पवार हे गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणून कार्यरत आहेत. जालना शहरातील सामाजिक प्रश्नांवर त्यांची पकड असून, पक्षसंघटना बळकट करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या जनसंपर्काची आणि पक्षकार्यातील सातत्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवली आहे.

नियुक्ती पत्रात जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे यांनी म्हटले आहे की, ''पक्षाचे कार्यकर्ते म्हणून पवार यांनी जालना महानगरात अनेक लोकउपयोगी कामे करून जनमानसात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. आगामी काळात संघटना अधिक मजबूत करण्यासाठी ते अथक परिश्रम घेतील आणि ही जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडतील, असा विश्वास आहे.'' या निवडीबद्दल नारायण पवार यांच्यावर राजकीय आणि सामाजिक स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती भाजपसाठी महत्त्वाची मानली जात आहे.






**बदनापूर तालुक्यातील हलदोला शिवारात गुरुवार (दि १९) रोजी झालेल्या अवकाळी पाऊस आणि चक्रीवादळ तसेच गारांच्या सरीमुळे गट नंबर ३५ मधील विहीरीवरील सोलार पंप पॅनलचे नुकसान झाले. जवळपास तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. शेतकऱ्यांकडून नुकसान भरपाईची मागणी होत आहे.**

# रुपाली चाकणकरांना लक्ष्य करणे म्हणजे स्त्री-शक्तीचा अवमान!

## ॲड. अश्विनी महेश धन्नावत

**जालना -** सध्या महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय पटलावर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा, रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. अशोक खरात नावाच्या एका भोंदूबाबासोबतच्या त्यांच्या कथित संबंधांना आधार बनवून हे वादळ निर्माण केले जात आहे. मात्र, ही मागणी केवळ अन्यायकारक, अतार्किक आणि पूर्वग्रहदूषित नाही, तर एका सक्षम महिला नेतृत्वाला पद्धतशीरपणे संपवण्याचा हा एक निर्लज्ज प्रयत्न आहे. एखाद्या व्यक्तीच्या सामाजिक परिचयावरून त्याच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवणे आणि त्याच्या संपूर्ण कार्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणे, हे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांची पायमल्ली करण्यासारखे आहे.

अशोक खरात याच्यावर असलेले आरोप गंभीर स्वरूपाचे आहेत आणि कायद्याच्या चौकटीत राहून त्याची सखोल चौकशी झालीच पाहिजे. दोषी आढळल्यास त्याला कठोर शासन व्हायलाच हवे, यात दुमत नाही. परंतु, त्याच्यासोबत केवळ एका व्यासपीठावर उपस्थित राहिल्यामुळे किंवा सामाजिक कार्यामुळे ओळख असल्यामुळे रुपाली चाकणकर यांनाही त्याच तराजूत तोलणे हा शुद्ध बौद्धिक दिवाळखोरीचा प्रकार आहे. खरात याने स्वतःची एक सामाजिक प्रतिमा निर्माण केली होती, ज्यामुळे अनेक प्रतिष्ठित व्यक्ती त्याच्या संपर्कात आल्या. चाकणकर यांचा संबंधही त्याच्या सामाजिक कार्यापुरता मर्यादित होता. त्याच्या वैयक्तिक आयुष्यात किंवा पडद्याआड चालणाऱ्या कारवायांमध्ये त्यांचा कोणताही सहभाग नव्हता आणि त्यांना त्याची कल्पना असण्याचेही काही कारण नव्हते.

खरे तर, या प्रकरणात रुपाली चाकणकर या आरोपी नसून, त्या स्वतःच खरातच्या भोंदूगिरीच्या बळी ठरल्या आहेत, असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. ज्याप्रमाणे इतर अनेकजण त्याच्या प्रतिमेला फसले, त्याचप्रमाणे चाकणकरही फसल्या असू शकतात. महात्मा गांधीजींनी म्हटले होते, ''पापाचा तिरस्कार करा, पाप्याचा नाही.'' या उक्तीचा अर्थ समजून घेण्याची आज नितांत गरज आहे. आजपर्यंतच्या पोलीस तपासात किंवा कोणत्याही साक्षीपुराव्यात चाकणकर यांचा या गुन्ह्यामध्ये दुरान्वयानेही सहभाग असल्याचे समोर आलेले नाही. अशा परिस्थितीत, केवळ संशयाच्या धुक्यावर आधारित आरोप करून एका महिलेच्या प्रतिष्ठेची होळी करणे कोणत्या नैतिकतेत बसते?

महाभारतात भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला कर्माचा सिद्धांत समजावून सांगतात, ''कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।'' याचा भावार्थ असा की, व्यक्तीचे मूल्यमापन त्याच्या स्वतःच्या कर्माने होते, इतरांच्या नाही. रुपाली चाकणकर यांचे कार्य पाहिले, तर त्यांनी महिलांच्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. पुणे विद्यापीठातून एमबीए सारखी उच्च पदवी प्राप्त केलेल्या चाकणकर यांनी आपली सामाजिक कारकीर्द अगदी तळागाळातून, महिला बचत गटांच्या माध्यमातून सुरू केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी संपूर्ण राज्यात महिलांचे एक मजबूत संघटन उभे केले, जे त्यांच्या संघटन कौशल्याची आणि दूरदृष्टीची साक्ष देते.

ऑक्टोबर २०२१ मध्ये राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यापासून त्यांनी या पदाला खऱ्या अर्थाने न्याय दिला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आयोगाने हजारो पीडित महिलांना आधार दिला, कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये कठोर भूमिका घेतली आणि महिलांच्या सुरक्षेसाठी अनेक धोरणात्मक उपाययोजना सुचवल्या. त्यांच्या कामाची दखल घेऊनच त्यांची या पदावर पुनर् नियुक्ती झाली. अशा कार्यक्षम आणि महिलांच्या प्रश्नांची खोल जाण असलेल्या अध्यक्षा महाराष्ट्राला लाभल्या, हे आपले भाग्य आहे. त्यांना पदावरून हटवणे म्हणजे महिला सक्षमीकरणाच्या चळवळीला अनेक वर्षे मागे ढकलण्यासारखे आहे.

हे स्पष्टपणे दिसून येते की, चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी ही कायदेशीर किंवा नैतिक नसून, पूर्णपणे राजकीय हेतूने प्रेरित आहे. एका प्रभावीपणे काम करणाऱ्या महिला नेत्याची प्रतिमा मलिन करून राजकीय फायदा उचलण्याचा हा केविलवाणा प्रयत्न आहे. जर अशा दबावाला बळी पडून त्यांना राजीनामा द्यावा लागला, तर तो केवळ एका व्यक्तीचा पराभव नसेल, तर तो राज्यातील त्या प्रत्येक महिलेचा पराभव असेल, जी अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आणि न्यायासाठी आयोगाकडे मोठ्या आशेने पाहते.

यामुळे समाजात एक अत्यंत चुकीचा संदेश जाईल की, सार्वजनिक जीवनात सक्रिय असलेल्या महिलांना बदनाम करणे किती सोपे आहे. यामुळे महिलांना आधार देण्याऐवजी त्यांचे खच्चीकरण करण्याची प्रवृत्ती वाढेल. एका महिलेला दुसरी महिला आधार देत नाही, हा जो पारंपरिक आरोप केला जातो, तोच खरा ठरवण्याचा हा प्रकार आहे. एक महिला म्हणून आणि कायद्याची अभ्यासक म्हणून, मी या मागणीचा तीव्र शब्दांत निषेध करते.

म्हणून, समाजातील सुज्ञ नागरिकांनी आणि प्रसारमाध्यमांनी कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्यापूर्वी वस्तुस्थितीची खात्री करावी. पोलीस तपास निःपक्षपातीपणे होऊ द्यावा आणि न्यायालयाच्या निर्णयाची प्रतीक्षा करावी. तोपर्यंत, केवळ आरोपांच्या आधारे एका सक्षम महिलेच्या कार्याचे अवमूल्यन करणे थांबवावे. रुपाली चाकणकर यांना त्यांचे काम करू देणे आणि महिला आयोगासारख्या महत्त्वपूर्ण संस्थेचे पावित्र्य जपणे, हे आपल्या सर्वांच्या हिताचे आहे. न्यायाच्या नावाखाली अन्याय होऊ नये, एवढीच अपेक्षा.



## जालन्यात ईदचा जल्लोष! कदीम जालना ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज

# हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन; प्रशासन, पोलीस आणि हिंदू बांधवांकडून गुलाब पुष्प देत ईदच्या शुभेच्छा





**जालना । प्रतिनिधी -** शहरात पवित्र रमजान ईद सण अत्यंत उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील कदीम जालना येथील ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने एकत्र येत सामूहिक नमाज पठण करून अल्लाहकडे सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

रमजान महिन्याभराच्या कठोर उपवासानंतर ईदचा सण साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर आज सकाळी ईदगाह मैदानावर हजारो मुस्लिम बांधवांची उपस्थिती पाहायला मिळाली. नमाज अदा करताना संपूर्ण परिसरात भक्तिमय आणि शांततेचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे, जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्यासह पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते. विशेष म्हणजे, हिंदू बांधवांनीही या उत्सवात सहभाग घेत मुस्लिम बांधवांना गुलाब पुष्प देत ईदच्या शुभेच्छा दिल्या.

या अनोख्या उपक्रमामुळे जालन्यात पुन्हा एकदा सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि सौहार्दाचे सुंदर चित्र पाहायला मिळाले. धर्म वेगळे असले तरी माणुसकीचा धागा अधिक मजबूत असल्याचे या प्रसंगातून अधोरेखित झाले.

जालन्यातील ईद साजरी करण्याची ही परंपरा केवळ धार्मिक नसून सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारी ठरत आहे.

## जालना जिल्ह्याला 'यलो अलर्ट'; वादळी वाऱ्यासह गारपिटीची शक्यता

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात पुढील २४ तासांत पावसासह गारपीट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. असे प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा मुंबई यांनी २० मार्च रोजी दुपारी दिलेल्या अंदाजानुसार जालना जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह ताशी ५० ते ६० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. हवामान विभागाच्या इशाऱ्यानंतर जिल्हा प्रशासनाने तात्काळ मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. विजांचा कडकडाट आणि वादळी वारे सुरू असताना नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः वीज कडकडत असताना झाडाखाली उभे राहणे जीवावर बेतू शकते, त्यामुळे सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्यास सांगण्यात आले आहे.

## उसतोड कामगारांच्या मुलांना उज्वल भविष्याचा मार्ग दाखवणारे प्रशिक्षण संपन्न

**अंबड । प्रतिनिधी -** हंगामी स्थलांतरित उसतोड कामगार कुटुंबातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित या प्रशिक्षणात युवक-युवतींना शिक्षण, आरोग्य, संरक्षण, पोषण आणि सुरक्षित स्थलांतर या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणात अभ्यास पद्धती, बौद्धिक क्षमता, करिअर अभिरुची, मानसिक आरोग्य, ताण-तणाव, चिंता व उदासी यासंदर्भात समुपदेशक सौ. कलिदा उढाण यांनी मार्गदर्शन केले. तसेच सुशांत आशा यांनी ''मी कोण? माझी ओळख काय?'' या विषयावर आत्मपरीक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

पोक्सो कायदा, बालहक्क आणि बालविवाह प्रतिबंध याविषयी पोलिस निरीक्षक आदिनाथ ढाकणे यांनी सविस्तर माहिती दिली. याशिवाय युवकांना विविध कौशल्याधारित संधी, ग्रामपंचायत यंत्रणा, तसेच उसतोड कामगारांच्या समस्यांबाबत माहिती देण्यात आली. विशेषतः कामगारांची नोंदणी नसणे, ओळखपत्रांचा अभाव, सुरक्षित स्थलांतराची कमतरता, तसेच स्थलांतराच्या ठिकाणी महिलांसाठी स्वच्छता, पाणी व आरोग्य सुविधांची गरज यावर चर्चा करण्यात आली.

या प्रशिक्षणामुळे युवकांमध्ये जागरूकता निर्माण झाली असून, ''आपल्या हक्कांसाठी पुढाकार घेऊ'' अशी ठाम भूमिका त्यांनी व्यक्त केली. संत भगवान बाबा वस्तीगृह तसेच स्व. गोपीनाथ मुंडे महामंडळाच्या विविध योजनांची माहिती देत, गावपातळीवर वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले.

संस्थेचे सचिव अप्पासाहेब उगले यांनी युवकांनी हक्क, अधिकार आणि न्यायासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. संपर्क प्रमुख भाऊसाहेब गुजाळ यांनी गावपातळीवरील विकासात युवकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगितले. प्रकल्प व्यवस्थापक अश्वजित जाधव यांनी प्रशिक्षणाची रूपरेषा स्पष्ट केली, तर अनुप मोरे यांनी युवकांना आधुनिक तंत्रज्ञान व चा योग्य वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले.

घनसावंगी, परतूर व अंबड तालुक्यातील उसतोड कामगार कुटुंबातील युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी ओकार उगले, एकनाथ राऊत, राजेश वाघमारे, सुरेखा वाघमारे, महादेव खरात, आकाश चव्हाण, योगेश आढे, दुर्गा नाडे आदींनी परिश्रम घेतले.

# मुलांचा परभणी तर मुलींचा सांगली संघ ठरला जिजाऊ कबड्डी चषकाचा विजेता

## उत्कंठावर्धक अंतिम सामन्यात मुलींचा जालना संघ उपविजेता

**जालना । प्रतिनिधी -** महात्मा ज्योतिबा फुले सामाजिक कार्य सेवाभावी संस्था जालना आणि राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित पुरुष व महिलांच्या निमंत्रित गटातील राज्यस्तरीय जिजाऊ कबड्डी चषक स्पर्धेत शुक्रवार दि. २० मार्च रोजी उपांत्य आणि अंतिम लढती अत्यंत उत्कंठावर्धक ठरल्या. अंतिम सामन्यात मुलांच्या गटात परभणी संघाने अहिल्यानगर संघावर मात करून विजेतेपद पटकावले. मुलींच्या गटात शेवटपर्यंत उत्कंठावर्धक ठरलेल्या सामन्यात सांगली संघाने अवघ्या २ गुणांच्या फरकाने विजेतेपदावर आपले नाव कोरले. जालना संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

अंतिम सामने अत्यंत चुरशीचे ठरले. मुलांच्या गटात परभणी विरुद्ध अहिल्यानगर यांच्यात अंतिम सामना झाला आणि त्यात परभणीने विजेतेपदावर आपले नाव कोरले. अहिल्यानगर संघ उपविजेता ठरला. बीड तृतीय तर सांगलीने चतुर्थ पारितोषिक पटकावले. परभणीचा सारंग रोकडे अष्टपैलू खेळाडू ठरला. उत्कृष्ट चढाई आणि उत्कृष्ट पकडचे पारितोषिक अनुक्रमे रविराज पवार (बीड) आणि यश ओबी (सांगली) यांनी पटकावले.

मुलींच्या गटात अंतिम सामना शेवटच्या मिनिटापर्यंत उत्कंठा वाढविणारा ठरला. त्यात सांगली संघाने ३८ विरुद्ध ३६ गुणांनी हा सामना जिंकून विजेतेपद पटकावले. जालना संघ उपविजेता ठरला. मुंबई उपनगर तृतीय तर नाशिक संघ चतुर्थ पुरस्काराचा मानकरी ठरला. नाशिकची शेजल काकडे अष्टपैलू खेळाडू ठरली. उत्कृष्ट चढाई आणि पकडचे पारितोषिक अनुक्रमे कल्याणी शिंदे (जालना) आणि श्लोका पानबुडे (सांगली) ह्या ठरल्या. शुक्रवारी रात्री ९.३० वाजेपर्यंत सामने रंगले. पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी देशातील प्रथम मंडल स्तंभ निर्माते माजी आमदार डॉ. नारायणराव मुंडे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपमहापौर राजेश राऊत, माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर, महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे मंगल पांडे, जालना मर्चंट बँक चे चेअरमन सीए गोपाल अग्रवाल, जेईएस महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. जवाहर काबरा, नगरसेविका सौ. स्नेहलता कामड,भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव, सुघोष मुंडे यांची तर व्यासपीठावर स्पर्धेचे मुख्य संयोजक महात्मा फुले सामाजिक कार्य सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा. सत्संग मुंडे, सहसंयोजक विजय कामड, संयोजन समितीचे विजय कामड, सुभाष कोळकर, देवराव सोनवणे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, आश्लेषा स्कूलच्या संचालिका शुभदा मुंडे आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते मुले व मुलींच्या गटातील संघांना सारखीच स्वतंत्र पारितोषिके देण्यात आली. विजेत्या संघाला रोख ५१ हजार व चषक, उपविजेत्या संघाला रोख ३१ हजार व चषक, तृतीय व चतुर्थ संघाला प्रत्येकी रोख १५ हजार व चषक, अष्टपैलू खेळाडू, उत्कृष्ट चढाई व पकडसाठी प्रत्येकी ५ हजार रुपयाचे पारितोषिक देण्यात आले.

प्रास्ताविकपर भाषणात चषकाचे संयोजक प्रा. सत्संग मुंडे यांनी पावसामुळे शुक्रवारी सामने रद्द करण्यात आल्याचा संदर्भ देत, क्रीडा संकुलात इनडोर स्टेडियम असलेतरी, तांत्रिक त्रुटी असल्यामुळे उपयोग होत नसल्याने महापालिकेने




इंडोर स्टेडियमची उभारणी करण्याची मागणी केली.

व पुढील वर्षीदेखील जिजाऊ कबड्डी चषक आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले. सर्वांच्या सहकार्यामुळे ही स्पर्धा यशस्वी पार पडल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे कोषाध्यक्ष मंगल पांडे म्हणाले की, या प्रकारच्या स्पर्धा प्रत्येक जिल्हा पातळीवर होणे गरजेचे आहे. त्यातूनच राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी व्यासपीठावरील मान्यवरांचीही भाषणे झाली. पारितोषिक वितरण समारंभाला मान्यवरांसह कबड्डीप्रेमी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लहूराव दरगुडे यांनी केले तर आभार प्रा. सत्संग मुंडे यांनी मानले.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी संयोजक प्रा. सत्संग मुंडे, सहसंयोजक विजय कामड, आयोजन समितीचे पदाधिकारी सुदामराव सदाशिवे, ॲड. शिवराम सतकर, सुभाष कोळकर, देवराव सोनवणे, ओमप्रकाश चितळकर, अरविंद देशमुख आणि राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी विशेष परिश्रम घेतले.

### महापालिकेमार्फत इनडोवर स्टेडियम उभारण्यासाठी प्रयत्न-राजेश राऊत

यावेळी बोलताना उपमहापौर राजेश राऊत म्हणाले की, मीदेखील खेळाडूच आहे. या चषकातील दुसऱ्या दिवशीचे सामने पावसामुळे रद्द करावे लागल्याने प्रास्ताविकात संयोजक प्रा. सत्संग मुंडे यांनी ही समस्या विचारात घेता, महापालिकेने एखादे इनडोअर उभारावी अशी मागणी केल्याच्या अनुषंगाने बोलताना राजेश राऊत यांनी पुढील वर्षी आयोजित होणाऱ्या या चषकात महानगरपालिकेचाही वाटा राहील. इनडोअर स्टेडियम उभारणीसाठी निश्चितच प्रयत्न केले जातील. त्याचबरोबर महापालिकेतर्फे मराठवाडास्तरीय पहिले महापौर चषक जालन्यात आयोजित करून जालना यजमानपद स्वीकारेल, असा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

### आमदार झाल्याशिवाय रिटायर होणार नाही - भास्करराव अंबेकर

कबड्डी स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात उपमहापौर राजेश राऊत यांचे भाषण भास्करराव आंबेकर यांच्यापूर्वी नियोजित होते. मात्र, आंबेकर हे ज्येष्ठ असल्याने त्यांनी माझ्या आधी बोलावे, असे सन्मानपूर्वक मत राऊत यांनी व्यक्त केले. यावर मिश्किल टिप्पणी करत आंबेकर म्हणाले की, ज्येष्ठ म्हणजे रिटायरमेंटकडे होणारी वाटचाल. इतर क्षेत्रांत ठराविक वयानंतर निवृत्ती येते, हे सांगताना त्यांनी व्यासपीठावरील प्राचार्य जवाहर काबरा यांच्या निवृत्तीचाही संदर्भ दिला. ध्येय साध्य झाल्याशिवाय राजकारणात मात्र निवृत्ती नसते. मी आमदार झाल्याशिवाय रिटायर होणार नाही, असा निश्चय त्यांनी बोलून दाखवल्यानंतर टाळ्यांचा कडकडाट झाला. आंबेकरांनी कबड्डीच्या खेळातील पाय पकडणे या पकड शैलीचा उल्लेख करताना सांगितले की, कबड्डी हा असा खेळ आहे जिथे समोरच्या चढाई करणाऱ्याचे पाय धरून त्याला रोखले जाते. मैदानात पाय धरणे हा खेळाचा भाग आणि विजयाचा मार्ग असतो. दुसऱ्याला पकडण्याच्या नादात थोडीशी जरी चूक झाली तर स्वतःलाच बाद व्हावे लागते, असे त्यांनी सांगितले. आजकालची मुले मोबाईलवर खेळ खेळत आहेत. प्रत्यक्ष मैदानावर खेळ खेळले तरच यश आणि अपयशाची प्रचिती येते. मैदानी खेळामुळे शरीर सुदृढ आणि लवचिक बनते. तर मोबाईलवरील खेळामुळे मेंदू थकून जातो असे, त्यांनी स्पष्ट करून मैदानाकडे चला, असा सल्ला त्यांनी दिला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.